तरुण भारत
सातारा
सोमवार दि. २ फेब्रुवारी २०१५

डॉ. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कौरेगाव

# 'रयत'चा मार्गदर्शक हरपला

## रामराजे नाईक-निंबाळकरांचे प्रतिपादन  ॲड. रावसाहेब शिंदे यांना रयत परिवाराच्या वतीने श्रद्धांजली

प्रतिनिधी
सातारा

ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या रुपाने प्रति कर्मवीर अण्णांसारखे नेतृत्व रयत परिवारास लाभले. कर्मवीरांनी लावलेल्या रयतच्या वटवृक्षाच्या कक्षा रुंदावण्यात त्यांचे मोठे योगदान असून अशा कर्मयोगीस समाज मुकला आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील त्यांचे गांधीवादी विचार समाजाला अखंड मार्गदर्शक ठरतील, अशा शब्दात माजी मंत्री रामराजे नाईक-निंबाळकर यांनी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे यांना श्रध्दांजली वाहिली.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे यांचे २६ जानेवारी रोजी निधन झाले. रयत परिवारातर्फे येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये श्रध्दांजली कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर आणि रयत सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**सातारा : रयत परिवाराकडून आयोजित शोकसभेत ॲड. रावसाहेब शिंदे यांना श्रद्धांजली वाहताना आमदार रामराजे नाईक निंबाळकर समवेत डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर, डॉ. अनिल पाटील, डॉ. गणेश ठाकूर, विजय कोलते, डॉ. डी. डी. पाटील, प्राचार्य उत्तम अवारी.**

'रयत'चे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी ॲड. रावसाहेब शिंदे यांनी ४० वर्षांहून अधिक काळ कर्मवीरांच्या विचारांनी 'रयत'चे कार्य वाढविले असे सांगून ॲड. शिंदे यांनी लिहिलेले इच्छापत्र वाचून दाखविले.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी आदर्श मित्र, मार्गदर्शक व गुरू असणाऱ्या ॲड. शिंदे यांच्यासारख्या महामानवास समाज मुकला आहे, असे सांगितले.

संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी १९७६ पासून रयतच्या जडणघडणीत जबरदस्त योगदान देणारे आणि कर्मवीरांच्या कुटुंबीयांचे सदस्य असणाऱ्या ॲड. शिंदे यांच्या विचारांचा वारसा सदैव जोपासला जाईल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

डॉ. शैला दाभोळकर यांनी अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीतील आणि 'साधना'चा सच्चा विवेकी साथी असणाऱ्या ॲड. शिंदे यांना समाज मुकला आहे. मोहनराव कदम (सांगली) यांनी संपूर्ण आयुष्यभर सज्जन असणारे आदर्श व्यक्तिमत्त्व स्वतःच्या कृतीतून जोपासणारे ॲड. शिंदे हा सच्चा समाजसेवक आपल्यातून निघून गेल्याचे दुःख व्यक्त केले.

सहसचिव प्राचार्य डॉ. डी. डी. पाटील, डॉ. अरविंद बुरुंगले, कराड शिक्षण मंडळाचे मुकुंद कुलकर्णी, बाबुराव शिंदे, विजयराव कोलते, हरिभाऊ माने, प्रा. संभाजीराव पाटणे आदींनी शिंदे यांच्या आठवणींना उजाळा दिला.